स्थापना १९५८

वर्षे ६० वे

**The Thane District Central Co-op.Bank Ltd., Thane.**

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे.**

छत्रपती शिवाजी पथ, ठाणे. (पो.बॉ.न.१९).

Reg.No.24917 Date 14th March, 1958. ☎: 2533 3014, 2533 3836.

Telegram : THANCO - BANK. Email : recruitment@thanedistrictbank.com

Fax No.:022- 25333836/25333014

# नोकर भरतीची जाहिरात

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेली खालील श्रेणीनिहाय रिक्त पदे सरळसेवा पध्दतीने भरावयाची आहेत. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या संकेतस्थळावर अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | श्रेणी | भरावयाची पद संख्या |
|---|---|---|
| १ | अधिकारी (जेएम) | ३ |
| २ | सि.बँकींग असिस्टंट | १९ |
| ३ | ज्यु.बँकींग असिस्टंट | १६० |
| ४ | शिपाई | २० |
| ५ | सुरक्षारक्षक /वॉचमन | ३ |

उपरोक्त पदांसाठी समांतर आरक्षणानुसारच्या जागा, शैक्षणिक पात्रता, अनुभव, वयोमर्यादा, परिविक्षाधिन कालावधी, वेतन, निवड पध्दती, अटी व शर्ती ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत व परीक्षा शुल्क इ.बाबतची विस्तृत माहिती बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या संकेतस्थळावर दिनांक १६/१०/२०१७ ते ३०/१०/२०१७ पर्यंत पहावयास उपलब्ध होणार आहे.

प्रस्तृत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत. सदर संकेत स्थळाला भरतीप्रक्रियेच्या दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी दिनांक १६/१०/२०१७ रोजी सकाळी १०.३० पासून ते दिनांक ३०/१०/२०१७ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत राहील. तसेच परीक्षा शुल्क दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बँकेच्या च्या सर्व शाखा व विस्तारकक्षांमध्ये दिनांक १६/१०/२०१७ पासून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) दिनांक ३०/१०/२०१७ पर्यंत स्विकारले जातील. अर्जासोबत भरलेले परिक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) राहील

ठिकाण : ठाणे

दिनांक :१६/१०/२०१७

**प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्ष**

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे**

स्थापना १९५८

वर्षे - ५९ वे

**The Thane District Central Co-op. Bank Ltd., Thane.**

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे.**

**छत्रपती शिवाजी पथ, ठाणे. (पो.बॉ.न.१९).**

Reg.No.**24917 Date 14th March, 1958.** ☎ ०२२-२५३६०२३०

Telegram: THANCO - BANK. Email : recruitment@thanedistrictbank.com

Fax-०२२-२५३६०२३०

## नोकर भरतीची विस्तृत जाहिरात

दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेले सेवकमांडनूसारचे रिक्त पदे सरळसेवा पध्दतीने भरणेसाठी दिनांक १४६/१०/२०१७ रोजीच्या **दैनिक सकाळ व लोकसत्ता** या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरून जाहिरातीतील पदे भरणेकरीता बँकेस निवडसुची तयार करावयाची आहे. याकरीता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

### १ . अधिकारी (जे.एम.) :

मुळ वेतन श्रेणी रु.- ४६५-५६-५२१-८८-६०९-८९-६९८-१३४-१५०२-१३६-२१८२-१३७-२५९३-१०५०-५७४३-११००- १३४४३ (सरासरी वेतन रु.२९९६०/-)

| श्रेणी | भरावयाच्या रिक्त जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जे.एम. | ३ | - | - | - | - | - | - | - | ३ |

### २. सि.बँकिंग असिस्टंट :

मुळ वेतन श्रेणी रु. ३२०-३१-४१३-३४-४४७-३९-४८६-९५-६७६-११५-१३६६-११६-२०६२-११७-२६४७-८००-७४४७ (सरासरी वेतन रु.२२००२/-)

| श्रेणी | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सि.बँकिंग असिस्टंट | १९ | ६ | ३ | १ | - | १ | १ | २ | ५ |

### ३ ज्यु.बँकिंग असिस्टंट :

मुळ वेतन श्रेणी रु.- २८०-२२-३०२-२६-३८०-२९-४६७-९२-६५१-१०६-१२८७-१०७-१८२२-१०८-२२५४ (सरासरी वेतन रु.१९५५५/-)

| श्रेणी | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ज्यु.बँकिंग असिस्टंट | १६० | ४८ | २४ | ८ | ३ | ८ | ५ | १६ | ४८ |

**४ शिपाई :**

मुळ वेतन श्रेणी रु.- १८३-१९-२७८-३०-३६८-३१-४३०-३८-४६८-६१-६५१-८९-११८५-९०-१६३५-९३-२१९३

(सरासरी वेतन रु.१३४४३/-)

| श्रेणी | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिपाई | २० | ६ | ३ | १ | - | १ | १ | २ | ६ |

**५ वॉचमन :**

मुळ वेतन श्रेणी रु.- १८८-१९-२८३-२६-३३५-२८-४१९-३५-४५४-४६-५००-५१-६५३-७१-१००८-७३-११५४

(सरासरी वेतन रु.१३९३९/-)

| श्रेणी | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भूकंप ग्रस्त २% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षारक्षक/ वॉचमन | ३ | - | - | - | - | - | - | - | ३ |

**टिप:-**

१) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या संवर्गातील एकूण पदापैंकी आहे.

२) **सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होणेचा संभव आहे** व याबद्दल उमेदवाराची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही . हे अधिकार बँकेने राखुन ठेवलेले आहेत.

३) उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावे लागेल.

४) परिक्षेसाठी भरलेले शुल्क ना परतावा (Non Refundable) राहील.

**६)** उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव दि.३०/०९/२०१७ या दिनांकास प्रमाणपत्रासहित पुर्ण धारण करणे आवश्यक आहे

**१. ज्यु.मॅनेजमेंट (अधिकारी जेएम) :-**

उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेतील ६०% गुणासह पदवीधर अथवा वाणिज्य शाखेतील ५५% गुणांसह पदवीधर असावा. उमेदवाराने शासन मान्य संस्थेतुन -MSCIT हा संगणक कोर्स उत्तीर्ण केला असला पाहीजे. सहकार / बँकिंग क्षेत्रातील पदविका तसेच बँकिंग क्षेत्रातील अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

**२. सि.बँकिंग असिस्टंट :-**

उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेतील ५५% गुणासह पदवीधर अथवा वाणिज्य शाखेतील ५०% गुणांसह पदवीधर असावा. उमेदवाराने शासन मान्य संस्थेतुन -MSCIT हा संगणक कोर्स उत्तीर्ण केला असला पाहीजे. बॉकिंग क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य.

**३. ज्यु.बँकिंग असिस्टंट:-**

उमेदवार शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा उमेदवारास संगणकीय ज्ञान असणे आवश्यक राहील. उमेदवाराने शासन मान्य संस्थेतुन -MSCIT हा संगणक कोर्स उत्तीर्ण केला असला पाहीजे.

**४. शिपाई/ वॉचमन :-**

या पदासाठी उमेदवाराचे शिक्षण ८ वी उत्तीर्ण वा १० पर्यंत झालेले असावे.

**७) वयोमर्यादा व शिथीलता :**

सेवक भरतीसाठी समांतर आरक्षणानुसार निर्धारीत केलेली कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे असेल. मात्र वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक ३०/०९/२०१७ रोजीचे वय विचारात घेतले जाईल. शिपाई व वॉचमनपदासाठी किमान वय १८ वर्षे राहील व उर्वरित संवर्गासाठी किमान वयोमर्यादा २१ वर्षे राहील.

| वयोमर्यादा | समांतर आरक्षण | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महिला | अपंग / माजी सैनिक | प्रकल्प/ भुकंपग्रस्त | खेळाडू | अपंग | अपंग अंशकालीन पदवीधर बेरोजगार |
| ३८ | ३८ | ४५ | ४५ | ४३ | ४५ | ४५ |

**टिप :**

माजी सैनिकांसाठी वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक तीन वर्ष इतकी राहील.

**८) परिविक्षाधीन कालावधी : (Probation Period)**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षाधीन (हंगामी ) कालावधी १ वर्षाचा राहील. परिविक्षाधीन (हंगामी) कालावधीमध्ये उमेदवाराची सेवा असमाधानकारक असल्यास सदर उमेदवारास सेवेत कायम करणे वा न करणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

**९) निवड कार्यपध्दती :**

अ) लेखी परीक्षा -

सर्व श्रेणीतील पदांकरीता ९० गुणांसाठी लेखी परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये बँकिंग, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१, इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल. लेखी परिक्षेचे माध्यम मराठी व इंग्रजी राहील. सदर पदांच्या लेखी परिक्षेचे प्रस्तावीत वेळापत्रक साधारणत: दिनांक २६ नोव्हेंबर २०१७ व दिनांक १ डिसेंबर २०१७ राहील.

ब) कागदपत्र पडताळणी -

उमेदवारास लेखी परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राच्या प्राथमिक कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मात्र, याकरीता उमेदवारास लेखी परिक्षेत किमान ४५ गुण मिळविणे आवश्यक आहे.

प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र होणा-या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस बोलविले जाईल. या प्राथमिक कागदपत्र पडताळणीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास तो मुलाखतीस पात्र राहणार नाही.

क) मुलाखत -

लेखी परिक्षेत उत्तीर्ण होणा-या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात लेखी परिक्षेचे गुणानुक्रमे १० गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.

ड) उमेदवारांची अंतीम निवड सूची-

निवड समिती प्रतिनिधींनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी (+) अधिक लेखी परिक्षेतील गुण यांचे गुणानुक्रमे अंतीम निवड सूची तयार करण्यात येईल.

इ) उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहाणार नाही.

**१०) पदांच्या निवडीसाठीची कार्यपध्दती, अटी व शर्ती -**

लेखी परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क, मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल, अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता (तोंडी परीक्षा) करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशा उमेदवाराचे मागितलेले समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परीक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**सर्वसाधारण अटी :-**

१) उमेदवाराची लेखी परीक्षा प्रामुख्याने ठाणे शहरातील केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकतेनुसार जिल्हयातील इतर केंद्रांवर परीक्षा घेतली जाईल.

२) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारिरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) उमेदवारांस दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचे आदेशास आधिन राहून बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसांचे आंत रूजू होणे आवश्यक राहील.

५) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधीन (Probation) सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीत उपरोक्तप्रमाणे श्रेणीनिहाय दरमहा नियमित वेतन देण्यात येईल. या कालावधीतील कामकाज व वर्तणूक विचारात घेऊन सेवेत कायम केले जाईल.

७) नियुक्तीपूर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला आवश्यकता असल्यास अद्ययावत नॉन क्रिमीलेअर दाखला तसेच आवश्यक ती मूळ कागदपत्रे इत्यादिची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांच्या स्तरावर केली जाईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत त्यामुळे दिलेली नियुक्ती रद्द करणेत येईल.

**११) ऑनलाईन अर्ज व लेखी परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत :**

१) प्रस्तुत पदांकरीता फक्त बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या अधिकृत संकेतस्थळावरून विहीत ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/ अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या वेबसाईटद्वारे दिनांक १६/१०/२०१७ ते दिनांक ३०/१०/२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना,शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र/ पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण

व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहीती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा शिथिलीकरण वैगेरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी/ छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखी परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनंतर गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कागदपत्रे पडताळणी करीता पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना बँकेच्या **www.thanedistrictbank.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६(i) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारास बँकेच्या नजीकच्या शाखेत जाऊन परीक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे. ऑनलाईन अर्जात चलनाचा छापील क्रमांक, रक्कम भरल्याची दिनांक, परीक्षा शुल्क रक्कम भरलेल्या शाखेचे नांव भरणे अनिवार्य आहे. सदरचा मजकूर असत्य आढळल्यास उमेदवाराचा अर्ज लेखी परिक्षेपूर्वी बाद ठरविण्यात येईल.

६(ii)बँकेत रक्कम भरलेल्या चलनाच्या ३ प्रतीपैकी उमेदवारास त्यांची स्वत:ची प्रत बँकेकडून परत मिळेल. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी/मुलाखत घेतली जाणार नाही. बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक १६/१०/२०१७ ते दिनांक ३०/१०/२०१७ असा राहील. या दिनांकानंतर बँकेत परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही.

७) परीक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवाराना त्याची स्थिती **www.thanedistrictbank.com** या संकेत स्थळावर दि.१३/११/२०१७ नंतर पाहता येऊ शकेल.

८) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चे अद्ययावत ३.५ सें.मी.× ४.५ सें.मी. स्कॅन केलेले छायाचित्र (Photo) व पाढं-या स्वच्छ कागदावर **काळया शाईच्या पेनने स्वत: स्वाक्षरी** करुन स्कॅन केलेली १.५ सें.मी.× ३.५ सें.मी. आकारातील "JPG/ JPEG/ BMP" याप्रकारची स्वाक्षरी (signature) स्कॅन करुन **www.thanedistrictbank.com** संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. (छायाचित्र व स्वाक्षरीच्या स्कॅन केलेले ईमेजची फाईल साईज १५० केबी पेक्षा जास्त नसावी. त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही)

९) ऑनलाईन अर्ज स्विकरण्याची अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

१०) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/वेळापत्रक/परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईटवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरतीप्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहाण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

११) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नांवे रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालय)/ समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात किंवा जिल्हा सैनिक बोर्ड यांचेकडे नावे नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना वरील भरतीच्या पदासाठी लेखी परिक्षेसाठी स्वतंत्र्यरित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालिन अशा उमेदवारांनीदेखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१२) शासन निर्णय शालेय व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.३०.०४.२००५ मधील तरतुदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवरील खेळांचे प्राधिकृत केलेले सक्षम अधिका-याचे असावे. खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरीता ज्या उमेदवारांची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील तपासणी अहवालानंतरच त्यांची नेमणूक करण्यात येईल.

१३) अंशकालिन सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत तीन वर्ष दरमहा मानधनावर अंशकालिन काम केलेल्या पदवीधर/पदवीधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे अनिवार्य असून प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४) माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोदंणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावे लागेल.

१५) भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी शासन नोकरी मिळणेबाबत सक्षम अधिकारी यांचे विहित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१६) शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र.८२/२००१/म.से.आ.२०००/प्र.क्र.४१५/का.२,दि.२५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१७-१८ या कालावधीकरीता वैध असलेले (अद्ययावत अर्थात दिनांक ३१.०३.२०१७ नंतरचे वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबद्दलचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१८) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याचा निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

२१) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व बँकेची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

२२) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही.

२३) लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस /तोंडी परिक्षेस बोलविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२४) भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अशंत: त्यात बदल करणे, पदाच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार बँकेस राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार बँकेस राहील. याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

२५) लेखी परीक्षा, कागदपत्रे छाननी इ, करीता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेतस्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील. पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब, सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२६) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/माजी सैनिक यांनी समांतर आरक्षणाचा यापूर्वी लाभ घेतला असल्यास त्यांना पुन्हा या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

**१२) परीक्षा शुल्क :**

| **श्रेणी** | **रक्कम रु.** |
|---|---|
| अधिकारी (जेएम) | ६५० + ११८ GST |
| सि.बँकींग असिस्टंट | ६०० + १०८ GST |
| ज्यु.बँकींग असिस्टंट | ५५० + १०० GST |
| शिपाई | ४०० + ७२ GST |
| सुरक्षारक्षक /वॉचमन | ४०० + ७२ GST |

सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा (Non Refundable) राहील. श्रेणीनिहाय परीक्षा शुल्क दि.ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखेत /विस्तारकक्षामध्ये चलनाद्वारे भरावयाची आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख ३०/१०/२०१७ राहील याची नोंद घ्यावी.

**विशेष सूचना :**

१) या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.

२) अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी ०२२-२५३६०२३० या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

ठिकाण : ठाणे

दिनांक : १६/१०/२०१७

**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**

**दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. ठाणे**